# पर्यावरणावरील परिणामांचे मोजमापन कार्याचा

## सारांश अहवाल

खाण मूळवेळास - हरवित - कुडगांव

**[खाणपट्टा – 50.21 हेक्टर]**

**(उत्पादन क्षमता 20,472 ट.प्र. वर्ष वरून 1,00,000 ट.प्र. वर्ष)**

**गांव - मूळवेळास - हरवित - कुडगांव**

**तालुका - श्रीवर्धन**

**जिल्हा - रायगड (महाराष्ट्र)**

**अर्जदार**

**मेसर्स. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी**

रजनीकांत बी. पाजवनी. २७८, जीवन उदयोग बिल्डींग, डी एन् रोड़ फोर्ट मुंबई - ४०००१(महाराष्ट्र)

# कार्याचा सारांश

## 1.0 ओळख

हा प्रस्ताव उत्पादन क्षमता 20,472 टीपीए वरून 1,00,000 टीपीए पर्यंत वाढविण्या संदर्भात मूळवेळास - हारवित - कुडगांव बॉक्साइट खाणी [खाणपट्टा – 50.21 हेक्टर] संदर्भात असून ही खाण मूळवेळास - हारवित - कुडगांव या गावांच्या परिसरात असून तालुका - श्रीवर्धन, जिल्हा - रायगड, महाराष्ट्र येथे असून हा प्रस्ताव मेसर्स. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी मांडला. ता.14, सप्टेबर, 2006 या तारखेच्या नविन EIA [पर्यावरणावरील परिणामांचे मोजमापन] अधिसूचनेतील, सेक्शन 7(ii) च्या तरतूदीनुसार या प्रकल्पाचा अंतर्भाव होतो. मेसर्स. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी ही श्री. एस.टी. कोडेचवाड यांच्या मालकीची व्यावसायिक संस्था आहे .

बॉक्साइटचे 0.1 मीटीपीए उत्पादन हे या प्रकल्पाचे उद्दीष्ट आहे . ॲल्युमिनियम धातु किंवा ॲल्युमिनाच्या उत्पादनासाठी लागणा-या चांगल्याप्रतीचे बॉक्साइट खनिजाचा साठा किंवा संचय मूळवेळास - हारवित - कुडगांव या खाणीत उपलब्ध आहे.

## 1.2 प्रकल्पस्थळाची माहिती

तक्ता – 1

| अनु क. | तपशील | तपशील |
|---|---|---|
| 1 | खाणपट्ट्याचे क्षेत्र | 50.21 हेक्टर |
| 2 | स्थळ | |
| | अ. गांव | मूळवेळास - हार्वित - कुडगांव |
| | ब. तालुका | श्रीवर्धन |
| | क. जिल्हा | रायगड |
| | ड. राज्य | महाराष्ट्र |
| 3 | अक्षांश | $18^0$ 13’ o2” उत्तर ते $18^0$ 13’ 28” उत्तर |
| 4 | रेखांक्ष | $72^0$ 52’ 36” पूर्व ते $73^0$ 00’ 03” पूर्व |

| | | |
|---|---|---|
| 5 | टोपोशीट नं. | 47 फ/7आणि ब/16 |
| 6 | समुद्रसपाटीपासूनची उंची | 114 मी. एमएसएल उंच दक्षिणबाजूने ते 12 मी. श्रमएसएल उत्तर बाजूने |
| 7 | जवळचे रेल्वे स्टेशन | 70 कि. मी. अंतरावर असलेले कोकण रेल्वेचे माणगांव हे रेल्वे स्टेशन प्रकल्पासून सर्वात जवळचे स्टेशन आहे. |
| 8 | जवळचे नगर/शहर | श्रीवर्धन शहर [25 कि.मी.] उत्तर दिशेस |
| 9 | जवळपासचे पाण्याचे स्त्रोत | ->अरबी समुद्र (1.5 किमी अंतरावर दक्षिणपश्चिम दिशेस)<br>-> कुडकीधरण(0.6 किमी अंतरावर दक्षिणदक्षिणपश्चिम दिशेस)<br>-> राजपुरी खाडी (2.0 किमी अंतरावर उत्तर दिशेस)<br>-> मृसला खाडी (6 किमी अंतरावर पूर्वदक्षिणपूर्व दिशेस दिशेस) |
| 10 | 10 कि.मी.त्रिज्येच्या परिसरात राष्ट्रीय अभयारण्य, वन्यपशु अभयारण्य आरक्षित संरक्षित जंगल [सीमेपासून ते सीमेपर्यंतचे अंतर] | 10 कि. मी. त्रिज्येच्या परिसरात काहीही नाही. |

# 1.2 प्रकल्पाची विस्तृत माहिती

## 1.2.1 प्रकल्पासाठीच्या मूलभूत आवश्यक गोष्टी

तक्ता – 2

| अनु क. | आवश्यक बाबी | आवश्यकता |
|---|---|---|
| 1 | जमीन | 50.21 हेक्टर (आधीच मिळविलेली आहे) |
| 2 | मनुष्यबळ | 138 व्यक्ती |
| 3 | पाणी | 23 केएलडी<br>(स्त्रोत – भूगर्भ जल आणि भुपृष्ठ जल) |

## 1.2.2 खाणकामाचा सविस्तर तपशिल

तक्ता – 3

| अनु क. | तपशील | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| 1 | खनिज शोधन | या ताब्यात असलेल्या खाणपट्टयाचे भूतकाळात खनिज शोधन झाले आहे.ही खाण कार्यरत असून खाणकामांमुळे या क्षेत्रात काही खडडे् विकसित झाले आहेत.या चालू योजनेच्या कार्यकाळात हा अस्तित्वातील पुरेसा खाणसाठा गरजेची पूर्तता करणारा असून पुढील खनिज शोधनाचे कार्य पुढील योजनेच्या कार्यकाळात प्रस्तावित आहे. |
| 2 | खाणकामाची पध्द्त | यांत्रिक ओपनकास्ट [मेकॅनाईज्ड ओपनकास्ट] पध्द्त. |
| 3 | बेंचची उंची आणि रूंदी | उंची- 0.8 मी. पृष्ठभागावरील अतिरिक्त भार आणि 4 ते 6 मी. कच्च्या धातुच्या मातीसाठी किंवा ओर.<br>रूंदी- 5 मी अतिरिक्त भारांसाठी, 5 मी कच्च्या धातुच्या मातीसाठी. |
| 4 | खाणकामा योग्य साठा किंवा संचय | 34.71 लक्ष टन |
| 5 | खाणीचे आयुष्य | 35 वर्षे @ 0.1 मीटीपीए |
| 6 | यांत्रिकीकरणाचा विस्तार | एअर कॉम्प्रेसर, जॅक हॅमर ड्रील, एक्सकॅव्हेटर, पोर्टेबल मॅगेझिन, एक्सप्लोडर आणि टीपर |
| 7 | जमिनीत खोल काम करण्याची अंतिम पातळी | पृष्ठभागाचे प्रकटीकरण 14 मी. खोल 100 एम. आरएल |
| 8 | पाण्याचा टेबल | 10 मी. बीजीएल पठाराच्या पायथ्याशी [ 80 एमआरएल च्या खाली ] |

## 1.2.3 जमिनीला भोक / छिद्र पाडणे.

हवेवरच्या जॅक हॅमरच्या साहयाने रांगेत 1 मी. अंतरावर छिद्रे केली जातील.

## 1.2.4 जमिनीत स्फोट करणे किंवा सुरूंग लावणे.

<u>विस्तृत सुरूंग लावण्याचे मापदंड</u>

छिद्राचा व्यास : 34 मीमीचा व्यास

छिद्राची खोली : 2.0 मी खोली
भार : 1.0 मी.
अंतर : 1.0 मी.
प्रत्येक छिद्रासाठीचा दारूगोळा: प्रत्येक छिद्रासाठी 800 ग्रॅम
पावडर फॅक्टर : 5 टनांस प्रति किलो दारूगोळा

## 1.2.5 चढणावळ आणि वाहतूक

योग्य आकाराचे तुकडे केलेल्या बॉक्साइटचा ढीग वेगळा ठेवला जाईल. नंतर ताबडतोब तो टीपर्स किंवा ट्रक्स मध्ये लोडरच्या साहयाने भरून पुढे उपयोगात आणणा-याला उत्पादकास पाठविला जाईल.

## 1.2.6 यांत्रिकीकरणाचा विस्तार

तक्ता – 4

| अनु क. | यंत्रे | यंत्राची संख्या | क्षमता |
|---|---|---|---|
| 1 | सेल्फ प्रोपेल्ड पोर्टेबल एअर कॉम्प्रेसर | 1 | 250 सीएफएम |
| 2 | कॉम्प्रेसड एअर ऑपरेटेड जॅक हॅमर ड्रिल्स | 3 | |
| 3 | एक्सव्हेटर एक्स200 | 2 | 0.90 मी$^3$ |
| 4 | जेसीबी / व्हिल लोडर | 1 | 0.30 मी$^3$ |
| 5 | पोर्टेबल मॅग्झीन | 1 | 500 किग्रॅ |
| 6 | एक्सप्लोडर | 2 | 100 शॉटस |
| 7 | टीपरर्स | 5 | 10 टन |

## 1.3 प्रस्तावित उत्पादन

या खनिजाचे खाणीकरता उत्पादन क्षमता 1,00,000 टीपीए करण्याचे प्रस्तावित केले आहे.

## 1.4 खनिजाचा उपयोग

खाणकामातून जे काही बॉक्साइट उत्खननांनतर मिळेल त्याचा वापर ॲल्युमिनियम आणि ॲल्युमिना उत्पादन करणा-या उदयोगासाठी केला जाईल.

## 2.1 पर्यावरणाचा विस्तारीत तपशील

### 2.1.1 हवामानाची परिस्थिती

रायगड जिल्हयाची हवामानाची परिस्थिती ही भारतातील पश्चिम किनारपट्टीवरील इतर भागासारखी असून भरपूर, नियमितपणे आणि मौसमी किंवा हंगामी पाऊस येथे मान्सुनमध्ये पडतो. किनारपट्टीवरील जिल्हा असल्यामुळे दैनंदिन आणि मौसमी हंगामातील तपमानात जास्त तफावत नाही. येथील वर्ष हे चार भागात विभागता येईल; उन्हाळयाचा मौसम हा मार्चपासून ते मे पर्यंत, पावसाचा मौसम हा जूनपासून ते सप्टेंबरपर्यंत, पावसाळयानंतरचा मौसम हा ऑक्टोबरपासून ते नोव्हेंबरपर्यंत आणि हिवाळयाचा मौसम हा डिसेंबरपासून ते फेब्रुवारीपर्यंत असतो.

या भागातील सरासरी जास्तीत जास्त तापमान 34.3$^0$ C मार्च, एप्रिल, मे या महिन्यात असते. तसेच, सरासरी कमीत कमी 15 ते 17 डिग्री सेंटीग्रेड नोव्हेबर किंवा डिसेंबर महिन्यात असते हा अहवाल अलिबाग स्थित भारतीय हवामानशास्त्र केंद्राने दिला आहे.

सूक्ष्म हवामानशास्त्र (अभ्यास कालावधी मार्च '09 ते मे '09)

| | |
| --- | --- |
| 1] महिन्यातील सर्वात जास्त तापमान | 38$^0$ C |
| 2] महिन्यातील सर्वात कमी तापमान | 27.3$^0$ C |
| 3] आर्द्रता [सरासरी ] | |
| सकाळी 8.30 | 60% ते 82% |
| संध्याकाळी 17.30 | 40% ते 73% |
| 4] वा-याचा वेग | 04-18कि.मी.प्रति तास |
| 5] वा-याची दिशा | उत्तर पूर्व पासून ते दक्षिण पश्चिम |

अभ्यास कालावधीत, सभोवतालच्या वा-याचा दर्जा आणि गोंगाटाची पातळी याच्यावर 10 ठिकाणांवरून देखरेख करण्यात आली. तसेच, पाण्याचे नमूने आणि मृदेचे नमुने 5 ठिकाणावरून घेण्यात आले. हवा आणि गोंगाट, पाणी आणि मृदा हे सर्व दर्जानुसार त्याच्या मर्यादेत मापदंडानुसार किंवा नियमांनुसार आहेत असे अभ्यासात आढळून आले.

### 2.1.2 जैविक पर्यावरण

<u>वनस्पती</u> - या क्षेत्रात वनस्पतीच्या मुख्य जाती बघायला मिळतात त्यातः औदुंबर, बेहेडा, पळस, अमालतास, आंबा, वड, आवळा, बेल, शिसम व इतर .

<u>वन्यजीवजंतू</u> - या क्षेत्रात प्राणी पक्ष्यांच्या मुख्य जाती बघायला मिळतात त्यातः रान मांजर, उंदीर, कोल्हा, साधी मैना, कबुतर, विषारी नाग किंवा सर्प, पोपट व इतर .

### 2.1.3 सामाजिक आर्थिक बाबीची परिस्थिती

भारताच्या 2001 च्या शिरगणतीनुसार अभ्यासाच्या भागातील लोकांची लोकसंख्या 26647 आहे. एकूण लोकसंख्येच्या अनुसूचित जातीचे 2.69% आणि अनुसूचित जमातीचे 20.41% प्रमाण आहे. सरासरी साक्षरतेचा दर 75.9% आहे. 5424 लोकांकडे स्वतःची घरे आहेत. एकूण काम करणारे 8210 लोक आहेत.

## 3.0 अपेक्षित किंवा पूर्वकल्पना असलेले पर्यावरणावरील परिणाम

- हवेवरील परिणाम - वेगवेगळया उत्खननाच्या कार्यामुळे म्हणजे ड्रिलींग, सुरूंग, ट्रक भरतांना, पृष्ठभागावरील अतिरिक्त भार काढतांना आणि वाहतुकीच्या कार्यात वाहनांमुळे होणा-या वापरामुळे धुळ निर्माण होऊ शकते (एसपीएम/आरएसपीएम). खाणीच्या साईट वर त्यासाठी योग्य प्रकारे पाणी फवारले जाईल. रोडवरून खनिज टीपर मधुन वाहतुक करतांना त्याला झाकून वाहतुक केली जाईल जेणे करून वा-यामुळे उडणा-या धुळीस प्रतिबंध किंवा कमी करता येईल.

- जल पर्यावरणावर होणारा परिणाम - वर्तमान स्थितीत खाणपट्टा किंवा आजुबाजुच्या क्षेत्रातुन कोणतेही पाण्याचे स्त्रोत वाहत नाहीत. जसे खाणपट्ट्याचे क्षेत्र स्थानिय भूगोलानुसार चढउताराचे असल्यामुळे खाणपट्टाक्षेत्रात पावसाळयात पृष्ठभागावर कोठेही पाण्याचा साठा होत नाही. उत्खननामूळे भूजलाला कोठेही छेद जात नाही. तसेच, कुठल्याही प्रकारचे पाणी बाहेर उत्सर्जित होत नसल्यामुळे तेथील कोठल्याही झाडास त्याचा फायदा होत नाही . त्यामुळे कोठलाही दुष्परिणाम पृष्ठभागावरील पाण्यावर अपेक्षित नाही.

- गोंगाटाचा परिणाम - गोंगाटाचे मुख्य स्त्रोत हे खाणीतील उत्खननक्षेत्रात आणि कार्यात वापरण्यात येणा-या यंत्राजवळ असेल. गोंगाटाची पातळी गर्भकेंद्र क्षेत्रात ही सर्व तपासणी केद्राजवळ 41 ते 50 डीबी (ए) या दरम्यान होती. म्हणजेच, अभ्यास क्षेत्रात

अभ्यास काळात सरासरी गोंगाटाची पातळी ही अपेक्षित पातळीत आहे . त्यामुळे तेथील लोकांवर कुठलाही मोठा दुष्परिणाम उत्खननामुळे जाणवणार नाही .

- जमिनीच्या परिस्थितीवरील परिणाम - उत्खननाच्या कार्यामुळे जमिनीचे स्वरूपच बदलून जाते. उत्खननमुळे त्या क्षेत्रात लॅटराईटयुक्त माती काढली जाते आणि बॉक्साइट खणून काढले जाते आणि त्यामुळे त्या भागाचा स्थानिय भूगोलच बदलून जातो. कोठलेही विषारी किंवा अपायकारक रसायनांचा उपयोग उत्खनन कार्यात होत नसल्यामुळे कुठलाही दुष्परिणाम जमिनीच्या दर्जावर होत नाही. साधारण 10.0 हेक्टर उत्खनन क्षेत्राला पाण्याच्या संचयासाठी तलावात रूपांतरीत केले जाईल आणि 21.5 हेक्टर क्षेत्रात पुनश्च जमिनीत भराव टाकून ती लागवडी योग्य बनविली जाईल.

- अभ्यास क्षेत्रात (10 कि.मी.त्रिज्येच्या परिसरात) कोठलेही राष्ट्रीय पार्क, वन्य पशु अभयारण्य,जैविक गोष्टीसाठी आरक्षित / संरक्षित वने व इतर प्रकारची वने नाहीत.

## 4.0 प्रकल्प संपल्यानंतरचा देखभालीचा कार्यक्रम

**तक्ता – 5**

| अनु क्र. | तपशील | तपासणीची वारंवारिता |
|---|---|---|
| 1 | हवामानाची माहिती | दररोज |
| 2 | प्रकल्प परिसरात हवेचा दर्जा | तीनमाही / सहामाही |
| 3 | पाण्याचा दर्जा | तीनमाही / सहामाही |
| 4 | गोंगाटाची पातळीची तपासणी | सहामाही |
| 5 | मृदेचा दर्जा | वार्षिक |
| 6 | शेतातील पिकांचे निरिक्षण | वार्षिक |

## 5.0 इतर जादा अभ्यास

इतर जादा केलेल्या अभ्यासात धोक्याचे मोजमापन आणि हानिचे नियंत्रण,जैविक अभ्यास, अचानक येणा-या आपत्ती व्यवस्थापनाच्या योजनांचा अंतर्भाव आहे.

## 6.0 प्रकल्पापासूनचे लाभ

प्रस्तुत प्रकल्पामुळे स्थानिक लोकांना प्रत्यक्षरित्या थेट आणि अप्रत्यक्षरित्या रोजगार मिळणार आहे. तसेच, सामाजिक कल्याणाचा उपक्रम म्हणून आरोग्य सुविधा, शैक्षणिक

सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा, मनोरंजनाच्या सुविधांचा लाभ कंपनीतर्फे कंपनीच्या कामगारांना व स्थानिक गांवकरी लोकांना मिळेल. अशा सुविधांच्या विकासासाठी कंपनी विविधरित्या मदत करेल उदा. शाळेच्या इमारतीचा विकास, आरोग्यचिकीत्सा सुविधा, रस्त्यांची देखभाल, शाळेच्या गणवेशाचे आणि मौसमानुसार ऊबदार चांदरीचे वाटप आणि पिण्याचे पाणी पुरविणे अशी कामे करण्यात येतील. ग्रामस्थांचे परंपरागत कौशल्ये जपणे आणि त्या कौशल्यांचा प्रशिक्षण देवून विकास करणे या सारख्या इतर उत्पन्न मिळविण्याच्या गोष्टी या प्रकल्पा अंतर्गत करता येतील.

# 7.0 पर्यावरण व्यवस्थापन योजना.

## 7.1 जमिन वापराच्या आराखडयाचे व्यवस्थापन

खाणपट्टयाचे एकूण क्षेत्रफळ 50.21 हेक्टर आहे. सिध्द्ांतीकपातळीच्या जवळपास 31.5 हेक्टर जमिन ही खणून जमिनीस हिनत्व किंवा हलक्या प्रतिची झालेली असेल. यापैकी 21.5 हेक्टर जमिनीत नंतर जेव्हा कार्य पूर्ण खोलीपर्यंत पोहचते तेव्हा खणलेल्या भागात उत्खनन करण्याच्या काळात टाकाऊ माल व माती त्या जमिनीत टाकुन लागवडीयोग्य बनविण्यात येईल आणि 10.00 हेक्टर जमिन ही पाण्याचा साठा करण्यासाठी विकसित करण्यात येईल. खाणीचे उत्खननानंतर जमिनीचा उपयोग मुख्य भागासाठी खालील तक्त्याप्रमाणे केलेला आहे.

**तक्ता – 6**

| अनु. क. | जमिन वापराचा प्रकार | (क्षेत्रफळ हेक्टर मध्ये) | | |
|---|---|---|---|---|
| | | वर्तमान (चालू) | 5 व्या वर्षा नंतर | खाणीचे आयुष्य संपल्यानंतर |
| 1 | पृष्ठभागावरील फेकलेल्या मातीचा ढीग | - | - | - |
| 2 | टाकाऊ माल साठविणे [बाहेरचा] | 0.14 | 2.20 | 7.00* |
| 3 | खणलेले [रिकामा] | 5.60 | 12.50 | 10.00 |
| | खणलेले [भराव घातलेले] | - | - | 21.5 |
| 4 | रस्ते | 0.60 | 0.60 | 0.60 |
| 5 | बांधकाम केलेले क्षेत्रफळ / सोयीसुविधांसाठी | 0.01 | 0.04 | 0.03 |
| 6 | वन तयार करणे [हरितपट्टा] | 4.0 | 6.5 | 7.6 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | कच्च्या धातूच्या साठवणूकीसाठी | - | 0.20 | 0.20 |
| 8 | प्रकीया करण्यासाठी [चुरडण्यासाठी ] | - | - | - |
| 9 | इतर [भिंती टिकवणे धरणाची तपासणी इ .] | - | 0.20 | 0.40 |
| 10 | अस्ताव्यस्त न केलेला भाग किंवा ज्यावर काहीही काम केले नाही असा भाग. | 39.86 | 27.97 | 2.88 |
| | | 50.21 | 50.21 | 50.21 |

**स्त्रोत : खाणीच्या बंद करण्याच्या प्रागतिक योजनेसह अधिकृत असलेली खाणकाम योजना**

* नोट- 7.0 हेक्टर क्षेत्रापैकी कचरा साठविलेल्या भागाच्या(बाहेरील बाजूने) 0.40 हेक्टर क्षेत्रावर वृक्षलागवड करण्यात येईल .

## 7.2 हवेच्या दर्जाचे व्यवस्थापन

- छिद्र पाडण्यासाठी ड्रिल यंत्रात धारदार ड्रिल बिटसचा वापर करण्यात येईल . ड्रिल यंत्र ओलेपणा असलेल्या सोयीसह वापरले जाईल .
- योग्य स्फोटकांसह प्रत्येक छिद्रावर नियंत्रित सुरूंग स्फोट केले जातील .
- वाहतुक करतांना वजनामुळे दाब येणारे सर्व रस्ते हे रूंद, योग्य आणि दाट आटोपशीर असतील . दाब येणा-या/हिसके बसणा-या रस्त्यांची योग्य प्रकारची देखभाल आणि धूळीचे दमनासाठी पाण्याचे फवारे मारले जाईल .
- यंत्राची आणि वाहनांची योग्य प्रकारची देखभाल केली जाईल ज्यायोगे ज्वलन प्रक्रीया सुधारली जाऊन प्रदूषण कमी होईल .
- हरितपट्टा/वृक्षलागवड हे रस्त्याच्या कडेला भराव टाकलेल्या क्षेत्रात आणि इतर क्षेत्रात धूळीस प्रतिबंध करण्यासाठी विकसित केले जातील .
- सीपीसीबीच्या मार्गदर्शक तत्वानुसार हवेच्या दर्जाची निरिक्षणे ठराविक कालावधीनंतर केली जातील .

## 7.3 गोंगाटाचे व्यवस्थापन

- छिद्र पाडण्याची किया ही धारदार ड्रिल बिटसचा वापर करून केली जाईल ज्यायोगे आवाज कमी होण्यास मदत मिळेल .

- यंत्राची योग्य देखभाल, ऑईलींग आणि ग्रीसींग ठरावीक कालावधी नंतर केल्यास आवाज कमी करण्यास मदत होईल.
- आवाज कमी करण्याची पुरेशी स्वयंचलित यंत्रे[सायलेन्सर] सर्व डिझेल इंजिनांना बसवण्यात येतील.
- खाणपट्टा क्षेत्रात आजूबाजुला आणि रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण केले जाईल ज्यायोगे गोंगाट कमी होण्यास मदत होईल.
- सर्व यंत्र वापरणा-या लोकांना आणि यंत्राजवळ काम करणा-या कामगारांना कान झाकण्या पुरवण्यात येतील.
- ठराविक कालावधीनंतर निरिक्षणे घेतली जातील.

## 7.4 जल पर्यावरण

- उत्खनन कार्यात कुठल्याही प्रकारचे रासायनिक द्रव्ये वापरली जात नाही ज्यायोगे प्रदूषण होईल किंवा पाणी दूषित होईल.
- पाण्याचा स्त्रोत 10 मी पृष्ठभागापासून पठाराच्या पायथ्याशी [80 एमआरएलच्या खाली] खाली आहेत .प्रस्तावित कार्य हे पृष्ठभागापासून 14 मी खोलीवर प्रस्तावित [100 एमआरएलच्या वर] होणार आहे. त्यामुळे या कार्यामुळे पाण्याच्या स्त्रोताना कोठेही छेद जाणार नाही.
- त्या भागात तयार होणा-या कच-याला नष्ट करण्यासाठी दूषित पाण्याची टाकी आणि शोष खड्डे यांची योजना केली जाईल.
- खणलेल्या क्षेत्रात चिखलाचे पाणी वाहून जाण्यासाठी माळे सारखे खड्डे चढत्याबाजूने तयार करून नंतर कालव्यासारखे उत्खनन केलेल्या खडड्यातून पाणी सोडले जाईल.
- जमिनीची धूप नियंत्रित करण्यासाठी पाण्याच्या वेगावर नियंत्रण करण्यासाठी ठराविक अंतरावर बाहेरच्या बाजूने पुरेसे बांध व रोधक तयार केले जातील.

## 7.5 घन कचरा व्यवस्थापन

- खाणपट्टा क्षेत्र हे लॅटराईट या अतिरिक्तभाराने झाकलेले असून त्याची जाडी 0.8 मी. असते. खोल आणि रूंद खड्डे खणण्याचे कार्य उत्खनन कियेत होते.जो पर्यंत बॉक्साइट मिळते तोपर्यंत बॉक्साईटच्या पूर्ण जाडीपर्यंत खोल खड्डे खणणे प्रस्तावित असते ज्यामुळे खनिजाचा पूर्ण साठा काढला जाईल.

- सुरवातीला उत्खनन काळात खाणपट्ट्याच्या सिमावर्ती भागात टाकाऊ माल साठविला जाईल

  आणि नंतर जेव्हा कार्य पूर्ण खोलीपर्यंत पोहचते तेव्हा खणलेल्या भागात भरावाद्वारे हा टाकाऊ माल भरला जाईल .

## 7.6 सामाजिक आर्थिक बाबींचे व्यवस्थापन

- स्थानिक लोकांच्या रोजगारासाठी एक चांगली स्थानिक लोकांचा सहभाग किंवा स्थानिकांना प्राधान्य असलेली योजना तयार केली जाईल .
- सामाजिक उपकमाचा भाग म्हणून आरोग्यसुविधा, शैक्षणिक सुविधा, पाण्याची पुरवण्याची सुविधा, मनोरंजनाच्या सुविधा येथे काम करण्या-या कामगारांना तसेच, जवळपासच्या स्थानिक लोकांना पुरविण्याची तरतुद केली जाईल .

## 7.7 हरितपट्टयाचा विकास आणि वृक्षलागवडीचा कार्यकम

खाणपट्टा क्षेत्र हे 50.21 हेक्टर आहे . साधारण एकूण क्षेत्राच्या 29.5 हेक्टर क्षेत्र हे वृक्ष लागवडीसाठी आणि हरितपट्टयासाठी राखुन ठेवलेले आहे . वृक्षलागवडीच्या कार्य कमचे टप्पे खालील तक्त्यात मांडले आहेत:

तक्ता - 7

| वर्षे | या भागावर काम केलेले नाही (हरितपट्टा) | | कच-याच्या ढिगाच्या बाहेरच्या बाजूने | | कच-याच्या ढिगाच्या आतल्या बाजूने (भराव टाकलेला) | | जमिनीच्या पृष्ठभागावरील कच-याचा ढिग | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्रफळ (हेक्टर) | झाडांची संख्या | क्षेत्रफळ (हेक्टर) | झाडांची संख्या | क्षेत्रफळ (हेक्टर) | झाडांची संख्या | क्षेत्रफळ (हेक्टर) | झाडांची संख्या | क्षेत्रफळ (हेक्टर) | झाडांची संख्या |
| **अस्तित्वतील** | 4.0 | 6000 | - | - | - | - | - | - | 4.0 | 6000 |
| **I** | 0.5 | 750 | - | - | - | - | - | - | 0.5 | 750 |
| **II** | 0.5 | 750 | - | - | - | - | - | - | 0.5 | 750 |
| **III** | 0.5 | 750 | - | - | - | - | - | - | 0.5 | 750 |
| **IV** | 0.5 | 750 | - | - | - | - | - | - | 0.5 | 750 |
| **V** | 0.5 | 750 | - | - | - | - | - | - | 0.5 | 750 |
| **VI वर्षा नंतर** | 1.1 | 1650 | 0.4 | 600 | 21.5 | 32250 | - | - | 23.0 | 34500 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | 7.6 | 11400 | 0.4 | 600 | 21.5 | 32250 | - | - | 29.5 | 44250 |

# 8.0 निष्कर्ष

पर्यावरण व्यवस्थापन योजनेनुसार असा निष्कर्ष काढता येईल की या प्रकल्प क्षेत्रात पुरेसे प्रतिबंधानात्मक परिमाणे प्रकल्पाद्वारे स्विकारली असून अंमलात आणली जातील ज्यात निरनिराळया प्रदूषणे परवानगी देण्याच्या मर्यादेत आहेत त्यामूळे या प्रकल्पामुळे कुठलाही प्रकारचा महत्व पूर्ण दुष्परिणाम परिस्थितीकीवर होणार नाही. आजूबाजुच्या क्षेत्रात हरितपट्टा विकासाचा उपयोग प्रदूषणाचा गंभीरपणा कमी करण्यासाठी तसेच, उत्खननामुळे होणा-या प्रदूषणाचे नियंत्रण करण्यासाठीचे परिणामकारक तंत्र म्हणून उपयोगात येईल.